**महाराष्ट्र विधानपरिषद**

**पत्रक भाग दोन (सुधारित)**

**सोमवार, दिनांक २४ जुलै, २०१७/श्रावण २, शके १९३९**

**संदर्भ : या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्रमांक ६५, गुरुवार, दिनांक ६ जुलै, २०१७.**

**९०.** सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या **सन २०१७ च्या तृतीय (पावसाळी)** अधिवेशनातील **अर्धा-तास** चर्चेच्या सूचना **बुधवार, दिनांक १९ जुलै, २०१७ रोजी ऑनलाईन पध्दतीद्वारे स्वीकारण्यात आल्या आहेत.** स्वीकृत सूचनांचे **बॅलट** घेण्यासंदर्भातील सविस्तर माहितीचे विवरण **पत्रक भाग दोन क्रमांक ६५, दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.** प्रस्तुत बॅलटचा तपशिल संसदीय कार्य विभागाने पाठविलेल्या अधिवेशनाच्या कामकाजाच्या तात्पुरत्या दिनदर्शिकेच्या आधारे तयार करण्यात आला होता. त्यामध्ये **सोमवार, दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाचे कामकाज घेण्यात येईल** असे दर्शविण्यात आल्याने **सदर दिवशी सभागृहात होणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या सूचनांचे बॅलट शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी घेण्याचे दर्शविण्यात आले होते.**

विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी घेण्यात आली. त्यामध्ये संसदीय कार्य विभागाकडून प्राप्त झालेल्या तात्पुरत्या दिनदर्शिकेवर विचारविनिमय करण्यात येऊन घेतलेल्या निर्णयानुसार **सोमवार, दिनांक २४ जुलै, २०१७ ते शुक्रवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७** या कालावधीसाठी सभागृहाचे कामकाज निश्चित करण्यात आले. त्यामुळे आता **तात्पुरत्या दिनदर्शिकेमधील कामकाज क्रमामध्ये दर्शविण्यात आलेल्या सोमवार, दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाची बैठक होणार नसल्याचे निश्चित करण्यात आले आहे.**

**अत: सोमवार, दिनांक ७ ऑगस्ट, २०१७** रोजी सभागृहाची बैठक होणार नसल्याने सदर दिवसासाठी **श्री.ज.बा.राणे, अवर सचिव (समिती)** यांचे दालन क्रमांक **१६०३,** विधान भवन, मुंबई येथे **शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ रोजी** स्वीकृत सर्वसाधारण अर्धा-तास चर्चेच्या सूचनेचे **बॅलट काढण्यात येणार नाही.**

**विधान भवन**
मुंबई.
दिनांक : २४ जुलै, २०१७

**डॉ.अनंत कळसे**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा.सदस्य
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३) महाराष्ट्र विधान मंडळातील सर्व पक्ष कार्यालये.